नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २९ | Issue - 29 | वार रविवार दि. १५ जून २०२५ | Blow- Sunday Date 15 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# १८ जूनपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडणार

## मुंबईत तुफान पाऊस; राज्यातील काही जिल्ह्यांना आज पावसाचा अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुसळधार ते अतिमुसळधार पावसाला सुरुवात होताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात दडी मारुन बसलेल्या पावसाने आज संध्याकाळी पुन्हा एकदा एन्ट्री मारली. सर्वात आधी ठाणे जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाला सुरुवात झाली. पावसाने शनिवारी संध्याकाळी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ शहरांना चांगलंच झोडपून काढलं. मुसळधार पावसामुळे कल्याण डोंबिवलीत सखल भागांमध्ये पाणी साचल्याची माहिती समोर आली. यानंतर ठाणे शहरात मुसळधार पाऊस सुरु झाला. हाच पाऊस पाहतापाहता मुंबईत येऊन धडकला.



मुंबईत ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडतोय. चाकरमान्यांचा ऐन घरी जाण्याच्या वेळी पाऊस पडत असल्यामुळे त्यांची मोठी ससेहोलपट होत आहे. अनेकांची तारांबळ उडत आहे. मुसळधार पावसामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याची कोणतीही बातमी सध्या तरी समोर आलेली नाही. पण पाऊस असाच कोसळत राहिला तर रेल्वे वाहतुकीवर परिणाम पडण्याची भीती आहे. राज्यातील काही जिल्ह्यांना उद्या पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागाकडून रत्नागिरी जिल्ह्याला उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पालघर, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण विदर्भात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ सुरु आहे.

कल्याण डोंबिवली परिसरात ढगाळ वातावरण होतं. यानंतर सायंकाळी सात नंतर कल्याण आणि डोंबिवली परिसरात रिमझिम पावसाला सुरुवात झाली. मात्र मागील अर्ध्या तासापासून पावसाचा जोर वाढल्याने जोरदार पावसानेच शहरातील काही प्रमुख रस्ते जलमय झाले आहेत. कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील रस्त्यावर देखील गुडघ्यावर पाणी साचल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. भिवंडी वरून शिळफाटा परिसरात जाणारा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावर पाणी साचल्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. महत्वाचे म्हणजे, महापालिकेने केलेल्या नाले सफाईच्या दाव्यांवरच या पावसाने प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मान्सूनपूर्व तयारीत ढिसाळपणा झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

# छत्रपती संभाजीनगरात वीज पडून चार जणांचा मृत्यू; दोन सख्खे भाऊ दगावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिल्लोड : तालुक्यात शनिवारी (१४ जून) दुपारी दोनच्या सुमारास वीज पडून चार जणांचा मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाला. यात एका महिलेसह दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे.

सारोळा शिवारात वीज पडून सख्खे भाऊ ठार झाले. तर पिंपळदरी शिवारात सख्ख्या भावांवर वीज पडली. यात एक भाऊ ठार झाला. तर एक भाऊ जखमी झाला. मोढा बु. शिवारात वीज पडून महिला ठार झाली. त्याचप्रमाणे खातखेडा शिवारात शेजारी वीज पडल्याने एक तरुण बेशुद्ध पडला. सिल्लोड तालुक्यात दुपारी दोन वाजेच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. शुक्रवारी (१३ जून) रात्री तालुक्यात काही भागात मृगाचा पाऊस झाल्याने पेरणीच्या कामांनी वेग घेत होता. शेतात काम करीत असताना वेगवेगळ्या ठिकाणी विजा पडल्या. यात सारोळा शिवारात वीज पडून यश राजू काकडे (वय १४), रोहित राजू काकडे (वय २१) या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला. हे दोघे भाऊ शेतात मका पेरणीचे काम करीत होते. पाऊस आल्याने ते झाडाखाली थांबले. या दरम्यान वीज पडली. त्यांची आजी आणि आई दुसऱ्या एका झाडाखाली थांबल्याने त्या बचावल्या. पिंपळदरी शिवारात शेतात काम करीत असताना दोन सख्ख्या भावांवर वीज पडली. यात शिवाजी सतीश गव्हाणे (वय ३१) याचा मृत्यू झाला. तर जीवन सतीश गव्हाणे (वय २०) जखमी झाला. जखमी जीवन गव्हाणे यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोढा बु. शिवारात वीज पडल्याने रंजना बापूराव शिंदे (वय ४७) या महिलेचा मृत्यू झाला. खातखेडा शिवारात विशाल ज्ञानेश्वर शिंदे (वय २०) या तरुणाच्या शेजारी वीज पडल्याने बेशुद्ध झाला. त्याच्यावर सिल्लोड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मृतांवर सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करुन सायंकाळी शोककुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

तालुक्यातील मांडणा शिवारात वीज पडून तीन वासरे दगावली. अन्वी शिवारात वीज पडून एक म्हैस दगावली. पिंपळदरी शिवारात पावसापासून बचाव करण्यासाठी झाडावर बसलेल्या माकडांवर वीज पडली. यात दोन माकडे दगावली. मृत माकडांवर ग्रामस्थांनी अंत्यसंस्कार केले. तालुक्यात एकाच दिवशी सात ठिकाणी वीज कोसळली

# मुंबईत डंपरने तिघांना चिरडलं, परिसरात मोठा राडा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मरण स्वस्त झालंय का? असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित होतोय. अहमदाबादमध्ये विमान अपघातात २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला. तसेच मुंब्र्यात लोकल ट्रेन अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर आता मुंबईच्या गोवंडी परिसरातून तशीच काहीशी बातमी समोर येत आहे. गोवंडीत भरधाव डंबरने ३ जणांना चिरडलं आहे. त्यामुळे तीनही नागरिकांचा जागेवरच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अपघातानंतर बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी जमा झाली. एवढंच नाही तर या घटनेनंतर स्थानिक नागरीक चांगलेच संतापले. स्थानिक नागरिकांनी यावेळी आक्रोश केला. स्थानिकांनी ठिय्या मांडत आंदोलन केलं. या घटनेत तीन जणांचा हकनाक बळी गेला, असं ते म्हणत होते. या घटनेची दखल पोलिसांनी घेतली. पोलिसांना या घटनेची माहिती मिळतात पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस घटनास्थळी दाखल झाले तेव्हा दोन्ही बाजूने जाणारी वाहतूक काही काळासाठी बंद झाली होती. स्थानिक नागरिकांच्या ठिय्या आंदोलनामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी तातडीने आरोपी वाहन चालकाला जमावाच्या ताब्यातून घेतलं. यावेळी पोलिसांकडून आंदोलन करणाऱ्या नागरिकांची समजूत काढली जात आहे. घाटकोपर मानखुर्द लिंकरोडवर शिवाजीनगर भागात हा अपघात झाला. या अपघातानंतर संतप्त जमावाने या मार्गावर ठिय्या मांडला. संतापलेल्या जमावाकडून यावेळी डंपरच्या काचा फोडत तोडफोड करण्यात आली. यावेळी दोन्ही दिशेने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. मुंबई आणि नवी मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या दोन्ही मार्गांवर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. आंदोलकांचा जवळपास अडीच तासांपासून ठिय्या सुरु होता. पोलिसांकडून त्यांची समजूत काढण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न सुरु होते. पण आंदोलक ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यामुळे पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. अखेर स्थानिक आंदोलक ऐकत नसल्याने पोलिसांना गर्दी पांगवण्यासाठी सौम्य करावा लागला. तसेच पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतल्याची देखील माहिती आहे. पोलिसांच्या या कारवाईनंतर आता दोन्ही बाजूला जाणारी वाहतूक सुरु झाली आहे. परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा आहे. पोलीस परिसरात शांतता कायम राहवी यासाठी प्रयत्नशील आहेत. दरम्यान, अपघात झाला तिथे सातत्याने अपघाताच्या घटना घडतात. इथे अनधिकृत पार्किंगमुळे या परिसरात वारंवार अपघात होतात असं स्थानिकांचं म्हणणं आहे. या अपघातानंतर आता प्रशासनाकडून काही कारवाई केली जाते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## टेम्बा बावुमाने २७ वर्षांचा 'चोकर्स'चा टॅग पुसला

# साउथ आफ्रिका 'चॅम्पियन'! डब्ल्यूटीसी फायनलमध्ये कांगारुंवर थरारक विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लॉर्डस्/ नवी दिल्ली : ज्यांनी त्यांच्या क्रिकेट प्रवासात अनेकदा अंतिम टप्प्यावर येऊन हार पत्करली, त्याच दक्षिण आफ्रिकेने अखेर इतिहास रचला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ च्या अंतिम सामन्यात टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर थरारक विजय मिळवत २७ वर्षांचा चोकर्स टॅग पुसून टाकला आणि आयसीसी ट्रॉफीवर दुसऱ्यांदा आपलं नाव कोरलं. टेम्बा बावुमा यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या २०२५ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा चार दिवसांत ५ गडी राखून पराभव केला. यासह १९९८ साली चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर आयसीसीच्या कोणत्याही स्पर्धेत विजय न मिळवू शकलेल्या दक्षिण आफ्रिकेने दुसरी आयसीसी ट्रॉफी जिंकली.



या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून पहिल्या डावात ब्यू वेबस्टरने सर्वाधिक ७२ धावा केल्या, ज्यात ११ चौकारांचा समावेश होता. माजी कर्णधार स्टीव्ह स्मिथने ६६ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने सर्वाधिक पाच बळी घेतले, तर डावखुरा वेगवान गोलंदाज मार्को जॅन्सनला तीन विकेट घेतले. फिरकी गोलंदाज केशव महाराज आणि एडेन मार्कराम यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतला आणि ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या २१२ धावांवर आटोपला.

पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांची कामगिरीही निराशाजनक होती. परिणामी, संपूर्ण दक्षिण आफ्रिकन संघ १३८ धावांवर ऑलआउट झाला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून डेव्हिड बेडिंगहॅमने सर्वाधिक ४५ धावा केल्या. तर कर्णधार टेम्बा बावुमाने ८४ चेंडूत चार चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३६ धावांची खेळी खेळली. ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने सहा विकेट घेतल्या, तर मिचेल स्टार्कला दोन यश मिळाले. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाला ७४ धावांची आघाडी मिळाली.

ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावाबद्दल बोलायचे झाले तर, कांगारू संघाचा स्कोअर एकेकाळी सात विकेटवर ७३ धावा होता. येथून, यष्टीरक्षक फलंदाज ॲलेक्स कॅरी आणि मिचेल स्टार्क यांच्या शानदार फलंदाजीमुळे ऑस्ट्रेलिया २०७ (पान २ वर..)



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## साउथ आफ्रिका 'चॅम्पियन'! डब्ल्यूटीसी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियावर थरारक विजय

(पान १ वरून..)

धावांपर्यंत पोहोचू शकला. स्टार्कने १३६ चेंडूत ५८* धावा केल्या, ज्यामध्ये पाच चौकारांचा समावेश होता. ॲलेक्स कॅरीने ५० चेंडूत ५ चौकारांसह ४३ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडानेही दुसऱ्या डावात शानदार गोलंदाजी केली आणि चार विकेट घेतल्या. तर लुंगी एनगिडीने तीन यश मिळवले. पहिल्या डावातील आघाडीमुळे ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेला २८२ धावांचे लक्ष्य दिले.

२८२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात ७० धावांवर आपला दुसरा विकेट गमावला. येथून एडेन मार्कराम आणि कर्णधार टेम्बा बावुमा यांनी तिसऱ्या विकेटसाठी १४७ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे दक्षिण आफ्रिकेचे काम सोपे झाले. या भागीदारीदरम्यान मार्करामने १०१ चेंडूत ११ चौकारांसह शतक पूर्ण केले. आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शतक झळकावणारा मार्कराम पहिला दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज ठरला.

दुसरीकडे, हॅमस्ट्रिंग दुखापतीशी झुंजत असतानाही टेम्बा बावुमाने शानदार खेळी केली. बावुमाने १३४ चेंडूत ६६ धावा केल्या, ज्यामध्ये पाच चौकारांचा समावेश होता. विरोधी कर्णधार पॅट कमिन्सने बावुमाला धावबाद केले. आपल्या संघाचा विजय निश्चित केल्यानंतर मार्कराम आऊट झाला. त्याने २२७ चेंडूत १३६ धावांची सामना जिंकणारी खेळी खेळली. या दरम्यान त्याच्या बॅटमधून १४ चौकार आले. मार्कराम बाद झाला तेव्हा दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी फक्त सहा धावांची आवश्यकता होती. टेम्बा बावुमा यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने इतिहास रचला आहे. लॉर्ड्सवर अंतिम सामन्यात त्यांनी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा चार दिवसांत ५ गडी राखून पराभव केला.

## सर्वोत्तम करिअरसाठी आवडीचे क्षेत्र निवडावे : प्रा.यशवंत गोसावी

### कै.महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने पंढरपूर व मंगळवेढा येथील गुणवंतांचा सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करिअरसाठी सगळी क्षेत्र समान आहेत. आपली बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते ही निवडणे म्हणजेच करिअर शोधणे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.यशवंत गोसावी यांनी व्यक्त केले आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. मंगळवेढा येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टी जिल्हा अध्यक्ष शशिकांत चव्हाण हे तर पंढरपूर येथील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी युवक नेते प्रणव परिचारक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.गोसावी हे बोलत होते. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील जवळपास ७०० गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल बॅग, ट्रॉफी व सन्मानपत्र अशा रूपामध्ये सन्मान करण्यात आला.



पुढे बोलताना ते म्हणाले की, आयुष्यात पदवी, पैसा व नोकरी या गोष्टी महत्त्वाच्या आहेतच पण आपल्या जगण्याची दृष्टी काय आहे ? जगण्याचा संकल्प काय आहे ? हे गूढ उलगडण्यासाठी आपण शिक्षण प्रवाहात संस्कार आणि संस्कृती यांचे संवर्धन करून प्रेरणादायी तत्वे आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आई-वडीलांचे कार्य संस्कार डोळ्यासमोर ठेवून आपण आपल्या जीवनामध्ये यशस्वी नागरिक म्हणून देशाच्या आणि समाजाच्या कामी आले पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांशी मनोगतपर संवाद साधताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की, कोणत्याही यशाने हुरळून व अपयशाने खचून न जाता स्वतःच्या क्षमतावर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी स्वतः ला सिद्ध करणे गरजेचे आहे. आमदार म्हणून तुमच्यासमोर आज उभा असलेले समाधान आवताडे म्हणजे प्रतिकूल परिस्थितीशी व मोठ्या संघर्षाचा सामना करून आत्मविश्वास आणि योग्य दिशा यांच्या बळावर उभा राहिलेले नेतृत्व असल्यामुळे जीवनामध्ये संघर्षाला न डगमगता आपण विजयाला खेचून आणत यशस्वी झाले पाहिजे असे त्यांनी सांगताच उपस्थित विद्यार्थी व पालकांनी जोरदार टाळ्या वाजवून त्यास प्रतिसाद दिला.

यावेळी प्राथमिक शिक्षण जिल्हा शिक्षणाधिकारी कादर शेख, उपविभागीय अधिकारी पंढरपूर सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर अर्जुन भोसले, माध्यमिक विभाग उपशिक्षणाधिकारी श्रीमती हवेली, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, पंढरपूर तहसीलदार सचिन लंगोटे, पंढरपूर मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी योगेश कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पंढरपूर गटविकास अधिकारी सुशील संसारे, पोलीस निरीक्षक तैयुब मुजावर, पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक वाटचालीबद्दल सखोल आणि आवश्यक मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, नवनाथ पवार, माजी प्राचार्य प्रा. येताळा भगत, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, माजी उपसभापती विजयसिंह देशमुख, संजय ननवरे, यशोदा पतसंस्थेच्या नीला आटकळे, राजेंद्र सुरवसे, माजी संचालक सुरेश भाकरे, शिवाजीराव नागणे, दत्तात्रय जमदाडे, सरोज काझी, प्रकाश गायकवाड, दीपक वाडदेकर, द्रोणाचार्य हाके, तुकाराम कुरे, डी. सी.जाधव, विनायकराव यादव, चंद्रकांत पडवळे, अजित जगताप, प्रवीण खवतोडे, अंबादास कुलकर्णी, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता, ज्ञानदेव जावीर, महादेव जाधव, संपादक दिगंबर भाकरे, सुदर्शन यादव, दादासाहेब ओमणे, गौडाप्पा बिराजदार, मोहन बागल, बाबासो पाटील, दत्तात्रय ताड, विश्रांती भुसनर, खंडू खंदारे, महादेव लवटे, यांचेसह अनेक मान्यवर व शिक्षण प्रेमी तसेच दोन्ही तालुक्यातील ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कै.महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## डोंगरांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी धोरण तयार करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये डोंगरांवर बऱ्याच झोपडपट्ट्या आहेत. अशा झोपडपट्ट्या पावसाळ्याच्या दिवसात भूस्खलन तसेच दरड कोसळल्यास धोकादायक ठरतात. डोंगरांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत पात्र झोपडपट्टी धारकांचे त्यांच्या सध्याच्या निवासाच्या नजिकच पुनर्वसन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीत आढावा घेताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर आदी उपस्थित होते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीसाठी जागा खरेदी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, अहमदाबाद येथील भास्कराचार्य अंतराळ अनुप्रयोग आणि भू - सूचना संस्थेच्या माध्यमातून विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन केंद्र (एमआरसॅक) च्या सहकार्याने अतिक्रमणाच्याबाबत अलर्ट देणारी यंत्रणा निर्माण करावी. ही कार्यप्रणाली कांदळवन अतिक्रमणबाबतही लागू करावी. अशी यंत्रणा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असावी. अशा यंत्रणेमुळे अतिक्रमण करण्यास अटकाव करता येणे शक्य होईल. ही संगणकीय प्रणाली पीएम गतिशक्ती पोर्टलशी संलग्न असावी. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रासाठी अशी यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

### झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कामांचा आढावा

बायोमेट्रिक पद्धतीवर आधारित घरोघरी सर्वेक्षणाचे काम डिसेंबरपर्यंत संपवावे. बंद असलेल्या झोपड्या ' रेकॉर्ड' वर आणाव्यात. नियोजन करताना अशा बंद झोपड्यांचा समावेश करता येईल. पुनर्वसनाची योजना राबवताना संयुक्त भागीदारीतून विकासाला प्राधान्य द्यावे. यामध्ये यंत्रणांनी प्राधान्याने काम करावे. किंवा यंत्रणेऐवजी नियमित तत्त्वावर पुनर्वसन योजना राबवावी. समूह पुनर्विकास योजनेमध्ये सर्व सुविधा देण्यात याव्यात. यासाठी चांगल्या सल्लागाराची नियुक्ती करावी. चटई निर्देशांक हा समूह विकासामध्ये वापरण्यासाठी देण्यात यावा. मुंबई महापालिकेच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सेल तयार करून या सेलच्या माध्यमातून समूह विकास (क्लस्टर) योजनेला गती देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम गतीने पूर्ण करावे. समुद्राकडील जागेचा पुनर्वसनासाठी उपयोग करताना त्यातील अडथळे दूर करावे. तसेच पुणे शहरामध्ये प्रकल्पग्रस्त नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे. त्यांना भाडे पद्धतीने किंवा अन्य पर्यायांचा अवलंब करून घरे देण्यात यावीत. पुणे शहरातील नदी काठावरील नागरिकांना पुराच्या पाण्याचा नेहमी सामना करावा लागतो. अशा नागरिकांचे गृहनिर्माणच्या योजनेद्वारे पुनर्वसन करावे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पात्र झोपडीधारकास प्रशस्त घर मिळून देत, त्यांच्या आयुष्यात सकारात्मक ऊर्जा देण्याचे कार्य करावे. प्राधिकरणाने आपल्या संकेतस्थळावर नागरिकांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून द्यावी. बैठकीदरम्यान झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मोबाईल प व पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

## बांधकाम पूर्ण झालेली रुग्णालये कार्यान्वित करून जनतेच्या सेवेत आणावीत : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बांधकाम पूर्ण झालेली रुग्णालये कार्यान्वित करून लवकरात लवकर जनतेच्या सेवेत आणावीत. तसेच कार्यान्वित करण्यात येणाऱ्या रुग्णालयामध्ये आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीचे नियोजन करण्यात यावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.




आरोग्य भवन येथे विविध बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव विरेंद्र सिंग, आरोग्य सेवा आयुक्तालयाचे आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, संचालक नितीन अंबाडेकर, सहसंचालक (रुग्णालये), डॉ. सुनिता गोलाईत, सहसंचालक (प्रा.आ.के.), डॉ. सुनीता दीक्षित व इतर अधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, रुग्णालयाच्या पूर्ण कार्यान्वयनासाठी सर्व आवश्यक व्यवस्था तत्परतेने करण्यात याव्यात, ज्यामुळे नागरिकांना वेळेत आरोग्य सेवा मिळू शकेल. तसेच ज्या ठिकाणी मनुष्यबळाची अडचण निर्माण होत असेल अशा ठिकाणी एजन्सी नेमून कंत्राटी पदभरती करण्यात यावी.

सर्व जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी सर्व आरोग्य सुविधा तत्काळ अद्ययावत करण्यात याव्यात. पूर्ण झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व साधनसामग्री अद्ययावत करण्यात यावी. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कोविड आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने व स्थानिक प्रशासनाने घराघरात जाऊन आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक मदत सेवा देण्यावर विशेष भर द्यावा. पुणे जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या अधिक दिसून येत असून स्थानिक अधिकाऱ्यांनी याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले.

पावसाळ्यात पाणी साचल्यामुळे वेगवेगळ्या रोगांचा धोका वाढतो. यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे आवश्यक आहे. जलजन्य आजाराच्या प्रभावी प्रतिबंधासाठी पाणी स्त्रोतांची प्रभावी गुणवत्ता नियंत्रण करावी. यासाठी पावसाळ्यापूर्वी स्वच्छता सर्वेक्षण अहवालाचा अभ्यास करून ज्या गावांना लाल कार्ड व पिवळे कार्ड देण्यात आले असेल अशा ठिकाणी जनजागृती करण्यात यावी. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी पाणी तपासणी प्रयोगशाळा अद्ययावत ठेवाव्यात, असे निर्देशही मंत्री श्री. आबिटकर यांनी दिले.

मर्च्युरी कॅबिनेटबाबत आढावा घेऊन ज्या ठिकाणी कामे अपूर्ण असतील अशा ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सकांनी या कामाला गती द्यावी. पावसाळ्यात तसेच इतरही कालावधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये,असे निर्देशही मंत्री श्री. आबिटकर यांनी दिले.

## म्हाडाच्या प्रकल्पांचा व प्रस्तावित नियमावलींचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत प्रस्तावित सुधारणा यासह म्हाडाच्या विविध अधिनियम अंतर्गत प्रस्तावित सुधारणांचा तसेच म्हाडा मार्फत राबविण्यात येणाऱ्या बीडीडी चाळ व इतर प्रकल्पांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते.

बांधकाम परवानगीसाठी आकारण्यात येणारे विकास शुल्कावरील दंडनीय व्याजाचा दर कमी करणे, म्हाडास उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त क्षेत्रफळाच्या सदनिका या संक्रमण शिबिरासाठी वापरणे अथवा सोडतीद्वारे विक्री करणे, विनिमय ३३ (४) अंतर्गत रहिवाश्यांना अतिरिक्त क्षेत्राचा लाभ देणे व या क्षेत्रावर प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्राचा लाभ देणे यासह विनिमय ३३(५), ३३(७), ३३(९) व ३३ (२४) अंतर्गत सुचविण्यात आलेल्या सुधारणांवर तसेच म्हाडा वसाहतीतील विकास आराखड्यातील आरक्षण, सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना आदी विषयांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

### बीडीडी चाळींच्या सदनिका हस्तांतरणाचे नियोजन

म्हाडाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या बीडीडी चाळ प्रकल्पांवरही यावेळी चर्चा झाली. वरळी बीडीडी चाळीतील ९८६९ पुनर्वसन सदनिकांपैकी ३८८८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून पुढील दोन आठवड्यात ५५६ सदनिकांचे हस्तांतरण होणार आहे. तसेच १४१९ सदनिकांचे सप्टेंबर २०२५ मध्ये हस्तांतरण करण्यात येणार आहे. तर १६४२ सदनिकांचे हस्तांतरण ऑगस्ट २०२७ पर्यंत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

नायगाव बीडीडी चाळीतील ३३४४ सदनिकांपैकी १९३८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून सप्टेंबर २०२५मध्ये ८६४ सदनिकांचे हस्तांतरण करण्याचे नियोजन असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ना.म. जोशी मार्ग बीडीडी चाळीच्या प्रकल्पातील २५६० पुनर्वसन सदनिकांपैकी १२४१ सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी ३४२ सदनिकांचे हस्तांतरण डिसेंबर २०२५पर्यंत करण्यात येणार आहे. गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर पत्राचाळ प्रकल्पातील मूळ ६७२ सभासदांना सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले आहे. या प्रकल्पातील ३ भूखंडावरील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले असून ४ भूखंडावरील एकूण १२४३ सदनिका बांधकामासाठी कार्यादेश जारी करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली. याशिवाय सुरभी गृहनिर्माण संस्था, पोलीस वसाहतींचा पुनर्विकास, आराम नगर अभिन्यासाचा पुनर्विकास, मोतीलाल नगर, अभ्युदय नगर प्रकल्प, वांद्रे रिक्लेमेशन व आदर्शनगर वरळी वसाहत, जीटीबी नगर सायन कोळीवाडा वसाहत पीएमजीपी वसाहत, पूनम नगर प्रकल्प तसेच मुंबई महानगर ग्रोथ हब आदी प्रकल्पांच्या पुनर्विकास प्रकल्पांचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडाने योग्य सुधारणा करण्याचे निर्देश नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. म्हाडा मुंबईचे मुख्याधिकारी मिलिंद बोरीकर, मिलिंद शंभरकर यांच्यासह विविध मंडळाचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मतदानरूपी आर्शीवाद देऊन माढा मतदारसंघातील जनतेने आमदार केलं; त्याचं विश्वासाने जनतेची सेवा करणार : आमदार अभिजीत पाटील

## आलेगाव येथे खासदार मोहिते पाटील आणि आमदार अभिजीत पाटील यांचा नागरी सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा मतदारसंघातील लोकांनी ज्या विश्वासाने आम्हाला निवडून दिले आहे त्याच विश्वासाने जनतेचे प्रत्येक काम करण्यासाठी जबाबदारी आमची असून रस्ते, वाहतूक, पिण्याचे पाणी, आरोग्यविषयक सुविधा, एमआयडीसी माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्ध, वीज पुरवठा व इतर बाबींसह युवक, महिला, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यमान कसे सुधरेल यासाठी सर्वसामान्य प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.



आलेगाव बुद्रुक तालुका माढा येथे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व माढ्याचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत आबा पाटील यांचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा व कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला.

यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, भारत पाटील, रावसाहेब देशमुख, बाळासाहेब ढेकणे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, डीव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, उपसरपंच रामचंद्र पवळ, शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे संचालक गोविंद पवार, शिवसेनेचे अध्यक्ष



मधुकर देशमुख, नानासाहेब ढवळे, सुरेश पाटील, अनिल पाटील, भारत माने, रामकृष्ण काळे, संतोष ढवळे, भाऊसाहेब काळे, पंढरीनाथ चंदनकर, गोरख देशमुख, आबासाहेब वाघ, अरुण गाडे, सतीश केचे, महेंद्र पाटील, दादासाहेब कळसाईत, हरिभाऊ माने, भारत माने, अनिल महाडिक, रावसाहेब ताठे, सतीश हेगडकर, प्रशांत पाटील, श्रीमंत केचे, लखन काळे, सुलतान शेख, शंकर सुरवसे, सतीश काळे, अशोक केचे, विकी भोसले, प्रताप पिसाळ, हनुमंत शेलार, बाळासाहेब शिरतोडे, दत्तात्रय बंडलकर, अध्यक्ष विनायक पाटील, बंडू चंदनकर, समाधान कवडे, माजी सरपंच समाधान पाटील, अभिजीत कवडे, ज्ञानदेव चंदनकर, रामचंद्र चंदनकर, किरण जाधव, अजय भोसले, बळीराम केचे, आप्पासाहेब यादव, अण्णासाहेब माने, जहागीर शेख, विकी भोसले, दीपक लांडगे, भास्कर गुरगुडे उपस्थित होते.

यावेळी आमदार अभिजीत पाटील म्हणाले की; माढा मतदारसंघातील मायबाप जनतेने मतदान रोपे आशीर्वाद देऊन तीस वर्षाची सत्ता उलथून विकासकामे करणाऱ्याला संधी दिली त्यांच्या या प्रेमातून कधीच उतराई होणार नाही. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने कटिबद्ध असून उजनी धरणाच्या पाण्याची नियोजन, भीमा नदीची आवर्तने, कोंढार भागातील बंधाऱ्याचा प्रश्न, राष्ट्रीय महामार्गावरील भिमानगर येथे उड्डाणपूल आरोग्य विषयक उपचारासाठी निधीसह अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.




## श्री विठ्ठल कारखान्याच्या कामगारांच्या मागण्या मान्य केल्या : आ. चेअरमन अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल कारखान्यावरील कामगारांचे सेवानिवृत्ती कर्मचारी व्यापारी यांना देखील रक्कम मिळावी या मागणीसाठी संतोष भालेराव यांनी १८ दिवस साखर संकुल समोर अमरण उपोषण केले यात यश आले असून कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सर्व मागण्या मान्य केल्या आहेत त्यामुळे भालेराव यांनी उपोषण मागे घेतले आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याकडे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकबाकी आहे व्यापाऱ्यांनीमाल दिलेले त्याची रक्कम थकीत आहे. मात्र गेल्या अनेक वर्षापासून कारखाना अडचणीत असल्यामुळे कर्मचारी व व्यापाऱ्यांना रखमा देण्यात आल्या नाहीत. या रकमा मिळाव्यात म्हणून कारखान्याकडे अनेक वेळा मागणी केली होती. कारखान्यावर सत्ता बदल होऊन अभिजीत पाटील यांचे पॅनल विजयी झाले व कारखान्याच्या चेअरमन पदी अभिजीत पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांनी चांगल्या प्रकारे कारखाना सुरू केला व कर्मचाऱ्यांची देणे व व्यापाऱ्याची देणे देणार असे जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी प्रयत्न करून शासनाकडून ३६७ कोटी रुपये कर्ज मिळवले. या कर्जामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणे व व्यापाऱ्यांची देणे देण्याचे नमूद करण्यात आले होते परंतु अनेक महिन्यापासून कर्मचाऱ्यांची व व्यापाऱ्यांची थकबाकी दिली नाही म्हणून संतोष भालेराव यांनी पुणे येथे साखर आयुक्त यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. गेल्या अठरा दिवसापासून त्यांचे अमरण उपोषण सुरू होते. अखेर अभिजीत पाटील यांनी भालेराव यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. त्यामुळे २०० सेवानिवृत्त कर्मचारी व व्यापारी यांना फायदा झाला आहे.

## आमदार समाधान अवताडे यांचा आरटीओ यांना एक कॉल पंढरपुरातील रिक्षावाल्यांचा प्रॉब्लेम सॉल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपुरातील रिक्षा चालकांवर अचानक कार्यवाहीचा धुमधडाका चालू असताना रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली. कारवाई चालू असतानाच एक गरीब रिक्षा चालकाने जुन्या बस स्टँड येथे स्वतःच्या अंगावरती पेट्रोल ओतून घेण्याचा प्रयत्न दिसून आल्याने.

ही वार्ता पंढरपूर मंगळवेढा चे आमदार यांना समजताच त्यांनी त्या ठिकाणी धाव घेऊन रिक्षा चालकाची भेट घेऊन त्यांच्या तक्रारी समजून घेतल्या आणि लगेच आरटीओ यांना फोन करून रिक्षा चालक यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. आषाढी वारीच्या मुहूर्तावर रिक्षाचालकांवर कारवाया? असा प्रश्न उपस्थित होत असताना आमदार समाधान आवताडे यांनी ह्या गोरगरीब रिक्षा चालकांवर ऑन द स्पॉट न्याय मिळवून देण्याचे दिसून आले.

आज या निर्णयामुळे आमदार आवताडे यांचे तोंड भरून कौतुक होत आहे. म्हणून जमलेल्या जनतेतून एकच आवाज निघत होता आमदार अवताडे यांच्या. आरटीओ यांना एक कॉल व पंढरपूर रिक्षावाल्यांचा प्रॉब्लेम सॉल केला आहे.



## सोपान गायकवाड म्हणजे कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व होते : अविनाश मडिखांबे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे सोलापूर जिल्हा जिल्हा उपाध्यक्ष, चिटणीस, तथा काजी कणबसचे माजी उपसरपंच सोपान गायकवाड हे एक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व होते. त्यानी नामदार रामदास आठवले, प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सातत्याने उपेक्षितांच्या मानवी हक्कासाठी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी जिवनाच्या अखेर श्वासा पर्यंत संघर्ष केला असून आज रिपब्लिकन चळवळीत त्यांची प्रकर्षाने उणिव भासते आहे.अशा भावपूर्ण शब्दात रिपाइं (आठवले) चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष आविनाश मडिखांबे यानी काजीकणबस येथे आयोजित कार्यक्रमात आदरांजली वाहिली.

काजीकणबस ता.अक्कलकोट येथे रिपाइं (आठवले) चे सोलापूर जिल्हा सचिव तथा काजीकणबस चे माजी उपसरपंच दिवंगत सोपान यशवंत गायकवाड यांच्या प्रथम स्मृतिदीना निमित्ताने रिपाइं सह गायकवाड परिवाराच्या वतीने आदरांजलीपर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मडिखांबे बोलत होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुध्द महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कालकथित सोपान गायकवाड यांच्या प्रतिमांचे पूजन करून आभिवादन करण्यात आले. या प्रसंगी उपसरपंच दत्ता मणाळे,पोलीस पाटील दिपक मंठाळे, रिपाइंचे धाराशिव जिल्हा युवा कार्याध्यक्ष तथा पत्रकार अरुण लोखंडे (जळकोट ता.तुळजापर) आदींची ही आदरांजलीपर भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पिआरपी चे नेते पँथर रत्नाकर गायकवाड यानी केले तर सुत्रसंचलन रिपाइंचे धाराशिव जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी केले.यावेळी डॉ. आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडिअम स्कूल नळदुर्गचे संस्थापक तथा रिपाइंचे नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, दलित पँथरचे धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख तथा पत्रकार शामकांत नागीले रिपाइंचे जळकोट शाखा अध्यक्ष आरविंद लोखंडे, रिपाइंचे भैया इंगळे, विनायक गायकवाड, अविनाश गायकवार, किसन खारवे,मल्हारी वाघमारे, हरिष गायकवाड, जयहिंद गायकवाड, लखन कांबळे, नवनाथ कांबळे, दिपक गायकवाड, राजकुमार गायकवाड, भैय्यासाहेब इंगळे, भीम मडिखांबे, धाराशिव कृषी विकास कंपणी चे संस्थापक सौ.शिक्षाबाई जेटीथोर, रमेश जेटीथोर,सह महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

**३८१ सिंचन प्रकल्पातून ३० लाख ६८ हजार ६७३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार**

## राज्यातील सिंचन प्रकल्पासह उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : राज्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्यातील ३८१ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून ३० लाख ६८ हजार ६७३ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर ४५ उदंचन प्रकल्पांच्या माध्यमातून ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती, तर ९६ हजार १९० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याचे विकासचक्र वेगवान करण्यासाठी सिंचन प्रकल्प आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबध्दरित्या गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांना दिलेल्या प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता यांच्या प्रगतीचा आढावा, तसेच पंपस्टोरेज धोरणासंदर्भात सामंजस्य करारांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि गिरीश महाजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील सिंचन प्रकल्प कृषी अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून अधिकचे सिंचन क्षेत्र निर्माण होणार असल्याने राज्यातील शेतकऱ्याचे जीवन अधिक सुसह्य होईल. उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्वारे पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाला विलंब होऊ नये.

शासनाने दोन वर्षापासून विविध सिंचन प्रकल्पांच्या १८५ कामांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून २६ लाख ६५ हजार ९०९ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर विशेष दुरुस्तीसाठी १९६ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. विशेष दुरुस्तीच्या माध्यमातून ४ लाख २ हजार ७६४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

ऊर्जा स्वावलंबनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पंपस्टोरेज धोरणांतर्गत केलेल्या सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील १५ कंपन्यांसोबत ३ लाख ४१ हजार ७२१ कोटीचे २४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामुळे राज्यात ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती होऊन ९६ हजार १९० रोजगार निर्माण होणार आहे.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणातून प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पांची झालेले कामे व निर्माण झालेले सिंचन क्षेत्र याची माहिती दिली. बैठकीस मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, विदर्भ, तापी, कोकण, गोदावरी, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संस्था सभासदानी २३ जून पर्यंत प्रत्यक्ष हरकती नोंदविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन लि. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. संस्थेचा नोंदणी क्रमांक पी.२९६४/१९५८ दिनांक २१/०३/१९५८ असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१-अ) मधील तरतुदीनुसार संस्थेची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे संस्थेचे सभासद यांना संस्था चालविण्यास स्वारस्य राहिलेले नाही असे प्रथम दर्शनी निदर्शनास येत आहे. तरी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१-अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त का करण्यात येवू नये? याबाबतच्या आपल्या हरकती / सुचना/ लेखी खुलासा हि नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द केल्यापासून ०७ दिवसाच्या आत किंवा दि. २३ जनू २०२५ रोजी पर्यंत या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर कराव्यात. आपले म्हणणे हरकती/सूचना/ खुलासा प्राप्त न झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन, संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी ,अशी माहिती सहायक आयुक्त, वस्त्रोद्योग सोलापूर निलेश निखाडे यांनी दिली आहे.

# आषाढी वारी निर्विघ्न पार पाडण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून आषाढी वारीच्या यशस्वीतेसाठी काटेकोर नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै २०२५ रोजी होत असून २६ जून ते १० जुलै २०२५ हा संपूर्ण यात्रा कालावधी आहे. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या व अन्य पालख्यांचे त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणे पंढरपूरकडे प्रयाण होणार आहे. संपूर्ण वारी कालावधीत पालख्या, दिंड्या त्यांच्या समवेत असणारे वारकरी, भाविक यांना पालखी मार्ग, पालखी तळ, पालखी विसावा ठिकाण, रिंगण व पंढरपूर शहरात सर्व प्रकारच्या उत्कृष्ट सोयी सुविधा संबंधित प्रशासकीय यंत्रणेने अत्यंत काटेकोरपणे उपलब्ध करून द्याव्यात त्यासाठी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व ही आषाढी वारी निर्विघ्नपणे पार पाडावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या नियोजनाच्या पूर्वतयारीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे येथून घेतला. याप्रसंगी दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले यांच्यासह संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

**प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आषाढी वारी २०२५ च्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत पंढरपूर शहरासह मानाच्या पालख्या व अन्य पालख्या त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. पालखीतळांचे, विसावा ठिकाणांचे मागील वर्षीपेक्षा अडीच पट म्हणजेच ७५ हजार घनमीटर चे मुरमीकरण करण्यात आल्याचे सांगून मुक्कामाच्या ठिकाणी २९ वॉटरप्रूफ मंडप टाकण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच कायमचे व तात्पुरत्या शौचालयामधून १५६ सक्सन व जेटिंग मशीनच्या माध्यमातून मैला बाहेर घेऊन जाण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय ठेवून कॉरिडॉर ची व्यवस्था करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासन वारीचे अनुषंगाने पूर्वतयारी पूर्ण केलेली असून वारीसाठी सज्ज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी तसेच सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनीही वारीच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाची माहिती दिली.**

उपमुख्यमंत्री श्री. पवार पुढे म्हणाले की, आषाढी वारी मध्ये सर्व मानांच्या पालख्या व अन्य पालख्या प्रमुख व विश्वस्त यांच्या सूचनेप्रमाणे पालखी मार्ग पालखी मुक्काम ठिकाण विसावा ठिकाणी व रिंगण व पंढरपूर शहरात वाखरी येथे आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यावर्षी पाऊस लवकर सुरू झालेला असून पावसाचे प्रमाण अधिक असू शकते त्या दृष्टीने पालखी मार्गावर, तळावर आवश्यक त्या ठिकाणी जलावरोधक मंडप उत्कृष्ट दर्जाचे टाकावेत. शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली करावी. पालखी सोहळा व वारकऱ्यांना या कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही या दृष्टीने सर्वांनी दिलेली जबाबदारी अत्यंत नियोजनबद्धरित्या पार पाडावी. या सोयी सुविधा निर्माण करताना आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पुणे, सातारा व सोलापूर जिल्हाधिकारी यांनी पालखी मार्गावर त्यांच्या त्यांच्या हद्दीत पालखी मुक्कामी ठिकाणी विसावा ठिकाणी जनरेटर ची व्यवस्था ठेवावी. कारण पाऊस लवकर सुरू झालेला आहे तसेच यावर्षी पाऊस अधिक प्रमाणात येण्याची शक्यता गृहीत धरून पालखी सोहळा प्रमुख व सोबतच्या दिंड्यांमध्ये येणारे वारकरी यांना पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वीज नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही या दृष्टीने तेवढ्या प्रमाणात जनरेटर व्यवस्था करून ठेवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी दिले. यासाठी जिल्हा परिषदेचा सेस मधील निधी वापरावा. जर हा निधी नसेल तर जिल्हा नियोजन समिती मधून निधी उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.



पोलीस विभागाने देहू व आळंदी येथून पालख्या निघाल्यानंतर त्यांच्यासमवेत असलेल्या शौचालय वाहने, पाण्याचे टँकर तसेच अन्य सुविधा पुरवणाऱ्या लोकांसाठी देहू, आळंदी ते पंढरपूर पर्यंत एकच पोलीस विभागाचा युनिक पास उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून त्या त्या जिल्ह्याच्या हद्दीत जाताना या लोकांना पर्यायाने वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे श्री पवार यांनी सांगून पालखी मार्गावर तसेच संपूर्ण वारी कालावधीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देण्याचेही त्यांनी सुचित केले.

यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत कुलकुंडवार यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने आज रोजी पर्यंत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत सादर केली. तसेच पोलीस विभागाने संपूर्ण वारी कालावधी पोलीस बंदोबस्त व गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती पोलीस विभागाचे आय जी सुनील फुलारी यांनी दिली.

## म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत लवकरच पाणी सुटणार : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला तालुक्यातील म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत पाणी सोडण्याची मागणीचे पत्र काही दिवसांपूर्वीच जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिले होते. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश आलेले असून लवकरच कोरडा नदीत पाणी सुटणार असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सांगोला तालुक्यातील सुमारे ३० ते ३५ गावे यात येत असून म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत सांगोला तालुक्यातील माण व कोरडा नदीवर १९ बंधाऱ्यांवर अवलंबून



असणाऱ्या १९०० ते २००० हेक्टर जमिनीसाठी पाणीसाठा कमी क्षमतेने असल्याने सांगोला तालुक्याचे हक्काचे पाणी तात्काळ सोडल्याने माण व कोरडा नदीवर अवलंबून असणारे १९ बंधारे पूर्ण क्षमतेने भरणार असून शेतकऱ्यांच्या पिकांचा प्रश्न याद्वारे तात्काळ मार्गी लागणार आहे.

आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीनुसार सांगोला तालुक्याचे हक्काचे पाणी म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत कोरडा नदीत पाणी सोडण्यात येणार असून सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात यावेत असे आदेश जलसंपदा मंत्री मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. मंत्री महोदयांनी यावर सकारात्मक दर्शवत पाणी सोडण्याचे आदेश दिल्याने आमदार डॉ.बाबसाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

## पुण्यातून ४ बांगलादेशी नागरिकांना अटक; लष्करी इंटेलिजन्स अन् पोलिसांची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी (इरप-सश्ररवशीहळ) नागरिकांचा मुद्दा गेल्या काही वर्षांपासून चर्चेत आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा लाभही या बांगलादेशी नागरिक महिलांनी घेतल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आले होते. तेव्हा, मुंबई पोलिसांनी या महिलांना अटकही केली होती. आता, पुण्यातही (झींपश) ४ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. लष्करी गुप्तचर विभाग आणि कोंढवा पोलिसांनी (ंश्रिळलश) संयुक्तपणे ही कारवाई केली. दरम्यान, बांगलादेशी नागरिक बनावट आधार कार्ड बनवून मजुरी व बांधकाम क्षेत्रात काम करत असल्याचं यापूर्वी देखील समोर आलं आहे.

बनावट आधार कार्डचा वापर करुन सोलापुरात राहणाऱ्या १२ बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी अटक केल्याची घटना काही महिन्यांपूर्वी घडली होती. सोलापुरातील एमआयडीसी परिसरातील एका गारमेंट कारखान्यात हे सर्वजन कामगार म्हणून कामाला होते. सोलापूर शहर पोलिसांना या बाबतीत गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी या सर्व बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेत चौकशी केली. यावेळी त्यांच्याकडे बनावट आधार कार्ड असल्याचे पोलिसांना आढळून आले होते. आता, पुणे पोलिसांनीही अशीच कामगिरी केली आहे. शहरातील कोंढवा परिसरातील एका मजूर वसाहतीतून या चार बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पळून जात असलेल्या या बांगलादेशींना लष्कर गुप्तचर विभाग आणि पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. स्वप्न मोंडल, मिथुन कुमार सांतल, रणधीर मोंडल आणि दिलीप मोंडल अशी अटक केलेल्या चौघांची नावे आहेत.


दरम्यान, महाराष्ट्रात बांगलादेशी रोहिंग्यांची व्याप्ती वाढत असल्याचे सांगत भाजप नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अमरावती पोलीस स्टेशनला भेट दिली होती. याठिकाणी ५ हजार लोकं आहे जे इथले असूच शकत नाही. त्यांनी जे ५०-७० वर्ष जुने पुरावे दिले ते आतापर्यंत काय करत होते. ज्यांनी जन्म प्रमाणपत्र मिळवले त्यांच्यावर या प्रकरणी कारवाई होईल. या बांगलादेशी नागरिकांचे जन्म प्रमाणपत्र रद्द होईल, असेही किरीट सोमय्या यांनी म्हटले होते. अमरावती आणि अकोल्यातही बनावट कादपत्रांच्या आधारे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी अटक केली होती. त्यामुळे, बांगलादेशी रोहिंग्यांचा मुद्दा महाराष्ट्रात चांगलाच चर्चेत होता. तर, किरीट सोमय्यांनी याबाबतीत पुढाकार घेतला होता.



## नागरसोगा येथील शेतकरी अनिल मुसांडे यांच्या पेरु बागेच सततच्या पावसाने नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील नागरसोगा येथील शेतकरी अनिल काशीनाथ मुसांडे यांनी शेती मालाला मीळत नसलेला भाव व सततची नापीकी होत असल्याने बागायत शेती करण्यासाठी अत्यल्प पाण्यावर ठीबकच्या माध्यमातुन पाण्याचे योग्य नियौजन करुन गेल्या दोन वर्षापुर्वी आपल्या वडीलोपार्जीत शेतात पिंक जातीच्या पेरुची लागवड केली व नियोजन बद्ध पद्धतीने दोन वर्ष जोपासणा केली. यावर्षी पेरु फळ घेण्यासाठी झाडाला भरपुर पेरु लागले व बाग पेरुंनी फुलुन गेली शेतकरी सुखावला व अर्थीक उत्पन्न होणार या आशेवर असतानाच पेरु बाग विक्रीसाठी आली पण सलग महिनाभर पडत असलेल्या सलगच्या पावसामुळे पेरुचे मोठे नुकसान होउन पेरु ला डाग पडल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन, ज्याप्रमाने लहान मुलांचे संगोपण करतो अगदी त्याच प्रमाने पेरु बागेच संगोपण करुन बाग फुलवली खरी पण सततच्या पावसाने शेतकर्याचे पेरु मातीमोल कवडीभावाने विक्री होत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे, तरी संबंधित कृषी विभागाने आमच्या ४ एक्कर पेरु फळांच्या बागेची पाहणी पंचनामा करुन आम्हाला अर्थीक मदत



मिळावी अशी शेतकरी पुत्र ओमकार अनिल मुसांडे यांनी मागणी केली आहे.

**पीडितांची स्थानिक प्रशासन व पोलिसांकडे योग्य न्याय मिळवून देण्याची मागणी**

## हत्ता गावात शेतीच्या वादातून दोन गटांत तुफान राडा; पत्रकारासह पत्नीवर हल्ला, एक गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : लोणार तालुक्यातील हत्ता गावात १० जून २०२५ रोजी रात्री ठिक ८:०० ते ८:३० च्या दरम्यान तुफान वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की एका पत्रकारासह त्यांच्या पत्नीवर अमानुष हल्ला करण्यात आला.. या घटनेने संपूर्ण गावात खळबळ उडाली आहे.

अलका रविंद्र पवार (वय ३२) आणि त्यांचे पती रविंद्र पवार हे शेतीशी संबंधित एका वादामुळे पूर्वीपासूनच मानसिक त्रासात होते. हे प्रकरण न्यायालयात सुरू असतानाही, रविंद्र पवार यांच्यावर आतेरिकी हमला केला आहे. आरोपी १ ते ६ यांनी कोणताच कारण न सांगता मारहाण सुरु केला व त्यामध्ये रविंद्र पवार हे जमिनीवर बेसूद आवस्थेत पडल्याने. रविंद्र पवार यांची पत्नी सौ. अलका रविंद्र पवार हिने आरडा ओरडा केल्याने तांड्यातील मंडळीने घटना स्थळी धाव घेतली.मारहाणी मध्ये बेसूद आलेल्या व्यक्तीला ग्रामीण रुग्णालय बिबी येथे उपचारासाठी नेले असता. तेथून सहयोग हॉस्पिटल मेहकर येथे रेफर केले असून उपचार सुरु आहे.

**आरोपी**

(१)शरद रामभाऊ पवार,
(२)विकास किसन पवार,
(३) दिलीप गोविंद पवार,
(४) संदीप गोविंद पवार,
(५) विजय किसन पवार
(६) गोविंद हरी पवार - यांनी मिळून हल्ला केला.

या हल्लयात रविंद्र पवार यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, फॅक्चर झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. त्याचबरोबर अलका पवार यांनाही जोरात मारहाण करण्यात आली आहे.

रविंद्र पवार हे पत्रकार असल्यामुळे हा हल्ला अधिक गंभीर मानला जात आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून लोणार पोलिस ठाण्यात संबंधित ६ जणांविरोधात भा.दं.वि. कलम १८९, १९०, १९१, ११८, ११५, ३५१ व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडितांनी स्थानिक प्रशासन व पोलिसांकडे योग्य न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण असून, आरोपी फरार असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.




## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

पालघर : मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघरमधील मेंढवण खिंड परिसरात धोकादायक वळणावर कंटेनर उलटल्याने भीषण अपघात घडला आहे. अपघातानंतर कंटेनरमधील वाहतूक होत असलेल्या पिंपातून हायड्रोजन पेरॉक्साइडची गळती सुरू झाली यामुळे मोठ्या प्रमाणात परिसरात धुराचे लोण पसरले. अपघातग्रस्त कंटेनरमधून निघणाऱ्या धुरामुळे वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. कंटेनरचा वाहनचालक हा जखमी झाला आहे. सुदैवाने या अपघातात कोणतेही जीवित हानी झालेली नाही. मात्र गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूक खोळंबली होती.

राष्ट्रीय महामार्गावर मुंबईहून गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर पालघर जिल्ह्यातील मेंढवण खिंड परिसरात असलेल्या धोकादायक वळणावर असलेल्या पुलावर कंटेनर अचानक उलटला आणि अपघात घडला. अपघातानंतर कंटेनरमधून वाहतूक होत असलेल्या पिंपातून हायड्रोजन पेरॉक्साइड या रसायनाची गळती सुरू झाली आणि मोठ्या प्रमाणात धूर परिसरात पसरला. अपघातग्रस्त कंटेनरमधून मोठ्या प्रमाणात धूर निघू लागल्याने महामार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.शनिवारी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास हा अपघात घडला आहे. सुदैवाने अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही, मात्र कंटेनर चालक जखमी झाला आहे.